**वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत**
**<u>व्याज सवलत अनुदान वितरीत करणेबाबत</u>**
**मे. बॉम्बे निटींग प्रा. लि., बेलापूर, नवी मुंबई जि. ठाणे**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक धोरण-२०१३/प्र.क्र.२३८/टेक्स-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- १८ मार्च, २०१४**

**वाचा :-१.** शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.१/टेक्स-२ दिनांक १ मार्च, २०१२

२. शासन शुध्दीपत्र, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.१/टेक्स-२ दिनांक १२ मार्च, २०१२, दि. १९/७/१२ व दि.१३/८/१२

३. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे क्र.१०८७५, दि.९ ऑक्टोबर, २०१३ चे पत्र.

**<u>प्रस्तावना :-</u>**

वरील संदर्भीय अनुक्रमांक १ येथील दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत TUF योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजना जाहिर करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत **मे. बॉम्बे निटींग प्रा. लि., बेलापूर, नवी मुंबई जि. ठाणे या विविंग / पावरलूम, एम्ब्रॉडरी** वस्त्रोद्योग घटकास व्याज सवलत अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजनेअंतर्गत **मे. बॉम्बे निटींग प्रा. लि., बेलापूर, नवी मुंबई जि. ठाणे या विविंग / पावरलूम, एम्ब्रॉडरी** वस्त्रोद्योग घटकास दिनांक २७/४/१२ ते दिनांक ३०/९/१२ या कालावधीतील अ.क्र. १ ते ३ या त्रैमासिकासाठी अनुज्ञेय व्याज सवलतीच्या रक्कमेपोटी खालीलप्रमाणे एकूण **रु.१३,५३,०००/- ( अक्षरी रुपये तेरा लाख त्रेपन्न हजार फक्त )** इतकी रक्कम मंजूर करुन वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

(रुपये लाखात)

| व्याज सवलत त्रैमासिकाचा कालावधी | व्याज सवलत त्रैमासिकाचा क्रमांक | कर्जाची रक्कम | अनुज्ञेय उच्चत्तम व्याजदर टक्केवारी | TUFS अंतर्गत अनुज्ञेय व्याजदर टक्केवारी | राज्य योजने अंतर्गत अनुज्ञेय व्याजदर % | व्याज सवलतीची अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २७/४/१२ ते ३०/६/१२ | १ | ६९०.३८ | ९.७५% | ५.००% | ४.७५% | ५.८२ |
| १/७/१२ ते ३०/९/१२ | २ | ६४५.३५ | ९.७५% | ५.००% | ४.७५% | ७.७१ |
| | | | | | **एकूण रुपये** | **१३.५३** |

२. **मे. बॉम्बे निटींग प्रा. लि., बेलापूर, नवी मुंबई जि. ठाणे ( NoN UID, UID No. 2013/G/01480 ) या विविंग / पावरलूम, एम्ब्रॉडरी** वस्त्रोद्योग घटकास वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार सदर रक्कम **सिटी बँक लिमिटेड, मुंबई** यांचे खालील नमूद खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी :-

**Bank Name :- CITI BANK**
**Name of A/C :- SUSP LOANS TUFS STATE GOVT-INR**
**IFSC :- CITI0100000**
**A/c No. :- D010009153630008**

३. **मे. बॉम्बे निटींग प्रा. लि., बेलापूर, नवी मुंबई जि. ठाणे** यांना मंजूर करण्यात आलेली व्याज सवलतीची उपरोक्त रक्कम **सिटी बँक लिमिटेड, मुंबई** यांनी सदर वस्त्रोद्योग घटकास वितरीत करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्रीमती अ. अ. चुरी , कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. र. मो. आडे, उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन **CITI BANK, Name of A/C :- SUSP LOANS TUFS STATE GOVT-INR, IFSC :- CITI0100000, A/c No. :- D010009153630008** यांना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (६४) केंद्र पुरस्कृत टफ (TUF) योजनेशी संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजासाठी अर्थसहाय्य योजना (२८५१५९८१) दत्तमत ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय, नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनुक्रमे अनौपचारीक संदर्भ क्रमांक १६३०/१४३१, दि. २६/११/१३ व क्रमांक ६३३/१३/व्यय-२, दिनांक २६/१२/१३अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**( र. मो. आडे )**
**महाराष्ट्र शासनाचे, उप सचिव**

प्रति,

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई
संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती / कार्यासन -१७ स)
अध्यक्ष, मे. बॉम्बे निटींग प्रा. लि., बेलापूर, नवी मुंबई जि. ठाणे
मॅनेजर, सिटी बँक लिमिटेड, फोर्ट, मुंबई.
निवड  नस्ती (टेक्स-२)